मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दिघी कॅम्प शाखेला महावितरणचा “हिरवा कंदिल”

## शहरातील नाशिक रोड व चऱ्होली शाखांचे पुनर्विभाजन : आमदार लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) च्या नाशिक रोड व चऱ्होली शाखांचे पुनर्विभाजन करून, नवीन दिघी कॅम्प शाखा कार्यालय स्थापन करण्यास मुख्य कार्यालय, महावितरण, मुंबई येथून मंजुरी मिळाली आहे. वाढती ग्राहक संख्या आणि अधिक कार्यक्षम सेवा देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी शहरातील वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणेकामी राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. महिनाभरापूर्वी मुंबई येथील उर्जा भवनला याबाबत सविस्तर बैठक झाली होती. त्यावेळी शाखा विभाजनाच्या मुद्दावर त्यांनी लक्ष वेधले होते.

वीज ग्राहकसंख्येचे पुनर्विभाजन खालीलप्रमाणे नाशिक रोड शाखा पूर्वीची ग्राहक संख्या 60 हजार 940 इतकी होती. आता नव्या पुनर्विभाजनानंतर ग्राहक संख्या 31 हजार 739 इतकी राहणार आहे. या शाखेअंतर्गत अलंकापूरम, चक्रपाणी वसाहत, गोडाऊन चौक, मोहन नगर असा परिसरत आहे. तसेच, चऱ्होली शाखेत पूर्वीची ग्राहक संख्या 33 हजार 449 होती. नव्या पुनर्विभाजनानंतर ग्राहक संख्या 28 हजार 282 इतकी निश्चित केली आहे. या शाखेअंतर्गत चार्होली गाव आणि परिसराचा समावेश आहे.

2014 मध्ये आमदार महेश लांडगे यांनी विधानसभेत निवडून आल्यानंतर पिंपरी-चिंचवडमधील समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्याचा संकल्प हाती घेतला. त्यानंतर 2017 मध्ये महापालिकेत भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर समाविष्ट गावांच्या विकासाला चालना मिळाली. त्यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर विकसित झाला. आता समाविष्ट गावांत वीज पुरवठा सक्षम होण्यासाठी महावितरण शाखा विभाजन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.




### नवीन दिघी कॅम्प शाखेत 34 हजार 368 ग्राहक...

»महावितरणने स्थापन केलेल्या नवीन दिघी कॅम्प शाखेत 34 हजार 368 ग्राहक संख्या आहे. त्यामध्ये दिघी गाव, बी यु भंडारी, मॅगझीन चौक, माऊली नगर, साई पार्क भागाचा समावेश आहे. एकूण ग्राहकसंख्या (तीनही शाखांची एकत्रित) 94 हजार 389 इतकी झाली आहे. महावितरणने केलेल्या या निर्णयामुळे विजेच्या वितरण व्यवस्थेची गुणवत्ता, वेग आणि प्रतिसादक्षमता वाढणार असून, ग्राहकांची समाधानाची पातळी अधिक उंचावेल, अशी अपेक्षा आहे.

# महाराष्ट्रातील पहिला “वेस्ट टू वंडर वर्ल्ड” थीम पार्क पिंपळे सौदागरमध्ये!

## माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांचा पाठपुरावा : महापालिकेकडून टाकाऊ साहित्याचा पुनर्वापर!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात राज्यातील पहिल्या आणि एकमेव “वेस्ट टू वंडर वर्ल्ड” थीम पार्कची उभारणी काम जोरात सुरू असून, यामुळे शहराच्या सौंदर्यात आणि पर्यटन महत्वात लक्षणीय वाढ होणार आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पालकमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली साकारत असलेले हे प्रकल्प महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरणार आहे.

या पार्कमध्ये जगातील सात आश्चर्यांसह एकूण १७ ऐतिहासिक वास्तूंची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. विशेष बाब म्हणजे, या स्मारकांच्या निर्मितीसाठी “वेस्ट टू वंडर” या संकल्पनेनुसार टाकाऊ साहित्याचा पुनर्वापर करण्यात येत आहे. या पार्कच्या उभारणीसाठी एकूण ११.०२ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे.



**थीम पार्कमध्ये साकारल्या जाणाऱ्या प्रमुख वास्तूंमध्ये खालील जागतिक स्मारकांचा समावेश आहे:**

- ताजमहाल (भारत)
- आयफेल टॉवर (फ्रान्स)
- बुर्ज खलिफा (दुबई)
- लीनिंग टॉवर ऑफ पिसा (इटली)
- सिडनी ऑपेरा हाऊस (ऑस्ट्रेलिया)
- अजिंठा लेणी (भारत)
- ला सागराडा फॅमिलीया (स्पेन)
- चिचेन इत्झा (मेक्सिको)
- पेट्रा ऑफ जोर्डन
- कोलोसियम ऑफ रोम
- बिग बेन ऑफ लंडन
- अंगकोर वट ऑफ कंबोडिया
- हंपीचे रथ (भारत)
- स्टॅच्यू ऑफ लिबर्टी (अमेरिका)
- ट्रेव्ही फाउंटन (इटली)
- माउंट रश्मोर (अमेरिका)

या थीम पार्कची उभारणी पूर्णत्वास गेल्यानंतर पिंपरी चिंचवडचे नाव राज्यातील एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून अधोरेखित होईल, यात शंका नाही. पार्कची रचना “टाकाऊ पासून टिकाऊ” या पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून करण्यात येत असल्याने पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही हे एक आदर्श प्रकल्प ठरणार आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत याबाबत सविस्तर माहिती घेतली. विरोधी पक्षनेते मा. विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी कामाची पाहणी करताना नागरिकांसाठी हे थीम पार्क लवकरच खुले होईल, अशी माहिती दिली. या भव्य प्रकल्पामुळे पिंपळे सौदागर परिसराचा कायापालट होणार असून, नागरिकांना एक वेगळीच पर्यटन अनुभूती मिळणार आहे. लवकरच हे पार्क नागरिकांच्या भेटीसाठी खुले करण्यात येणार असून, शहरातील नागरिकांमध्ये याबाबत मोठ्या उत्सुकतेचे वातावरण आहे.

# ‘ऑपरेशन नन्हे फरिश्ते’ मोहीम फत्ते

## ‘आरपीएफ’, रेल्वे पोलिसांकडून स्थानकांवरील 235 बालके सुखरूप घरी

**पुणे | प्रतिनिधी**

मध्य रेल्वे विभागांतर्गत रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) आणि रेल्वे पोलिसांनी (जीआरपी) एप्रिल आणि मे महिन्यात ‘ऑपरेशन नन्हे फरिश्ते’ मोहीम राबवून हरवलेल्या, घरातून पळून आलेल्या आणि अनवधानाने स्थानकात राहिलेल्या २३५ बालकांचा शोध घेत त्यांना पालकांपर्यंत सुखरूप पोहोचवले.

मध्य रेल्वे विभागांतर्गत मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, भुसावळ, नाशिक, सातारा, कोल्हापूर, सांगली ही स्थानके असून, या स्थानकांवर नेहमीच गर्दी असते. या रेल्वे स्थानकांवर काही बालके भांडण किंवा रागावल्यामुळे घर सोडतात. तसेच ग्रामीण भागातील काही मुले ही शहराच्या आकर्षणापोटी घर सोडून शहरात येतात. अशा बालकांसाठी ‘ऑपरेशन नन्हे फरिश्ते’ मोहीम राबविण्यात आली. मध्ये रेल्वे विभागातील ‘आरपीएफ’ आणि ‘जीआरपी’ विभागाने या मोहिमेंतर्गत चाइल्डलाइन या स्वयंसेवी संस्थेच्या समन्वयातून एप्रिल महिन्यात ११४ आणि मे महिन्यात १२१ अशी एकूण २३५ बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहोचवले.

या माहिमेत भुसावळ आणि नागपूर रेल्वे स्थानक परिसरात प्रत्येकी ६२ बालके आढळून आली. मुंबई आणि पुणे रेल्वे स्थानकावर अनुक्रमे ५३ आणि ५१ बालके आढळली. सोलापूर रेल्वे स्थानकावर आठ बालके सापडली. या बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहोचविण्यात आले असल्याचे मध्य रेल्वे विभागाकडून सांगण्यात आले. गेल्या वर्षी या कालावधीत १४९ बालके आढळून आली होती.



**बारा प्रवाशांना वाचविण्यात यश**

प्रवाशांच्या निष्काळजीपणामुळे रेल्वे स्थानकावर घडणाऱ्या अपघातांमध्ये ‘ऑपरेशन जीवनरक्षक’अंतर्गत ‘आरपीएफ’ जवानांनी १२ प्रवाशांचा प्राण वाचवला. त्यांपैकी तीन महिला आहेत. मागील वर्षी याच कालावधीत सात जणांचा प्राण वाचविण्यात यश आले होते.

**पालकांच्या स्वाधीन केलेल्या बालकांची संख्या**

- विभाग – वर्ष २०२४ – वर्ष २०२५
- मुंबई – ५२ – ५३
- भुसावळ – ४५ – ६२
- नागपूर – ३६ – ६१
- पुणे – १० – ५१
- सोलापूर – ६ – ८
- एकूण – १४९ – २३५

“ रेल्वे स्थानक परिसरात आणि गाड्यांमध्ये प्रवास करताना आढळून आलेल्या बालकांची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी ‘आरपीएफ’ आणि रेल्वे पोलिसांकडून विशेष शोधमोहीम राबविण्यात येते. घाबरलेल्या अवस्थेत किंवा एकट्या आढळून आलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांची ‘चाइल्ड वेलफेअर’ समितीसमोर चौकशी करण्यात येते. चौकशीदरम्यान पळून आल्याचे आढळून आल्यास बालकांच्या पालकांशी संपर्क साधून त्यांच्या ताब्यात देण्यात येते. गेल्या काही महिन्यांपासून घरातून पळून जाण्याचे प्रमाण वाढले असून, पुणे, कोल्हापूर, मिरज रेल्वे स्थानकातून मेअखेरपर्यंत १६० बालके सापडली आहेत.

**– प्रियंका शर्मा, वरिष्ठ सुरक्षा आयुक्त, मध्य रेल्वे, पुणे विभाग.**

# प्रभागाच्या प्रारूप आराखड्याचे आदेश

## जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांबाबत प्रशासनाची तहसीलदारांना सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रभागरचनेचा प्रारूप आराखडा करावा, अशी सूचना जिल्हा प्रशासनाकडून तहसीलदारांना करण्यात आली असून, त्याबाबतचे आदेश जिल्हा प्रशासनाकडून काढण्यात आले आहेत. प्रभागाचा प्रारूप आराखडा १४ जुलैपर्यंत जिल्हा प्रशासनाला सादर केला जाणार आहे.

राज्य सरकारला सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशानुसार, राज्याचा नगरविकास विभाग तसेच ग्रामविकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रभागरचनांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या गट, गण रचना करण्याचे आदेश यापूर्वीच ग्रामविकास विभागाने काढले आहेत. त्यानुसार, जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनी संबंधित भागातील लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती आणि आरक्षणाचे निकष लक्षात घेऊन प्रारूप आराखड्याचे काम सुरू केले आहे. प्रारूप प्रभाग आराखडा सादर करण्याची मुदत १४ जुलैपर्यंत आहे, अशी माहिती समन्वय अधिकारी चारुशीला देशमुख यांनी दिली.

दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडे सर्व तालुक्यांकडून प्रारूप आराखडा प्राप्त होताच त्याची तपासणी तसेच दुरुस्ती केली जाईल. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समितीच्या नोटीस बोर्डासह संकेतस्थळावर प्रारूप आराखडा प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे हरकती आणि सूचना सादर करण्यात येणार आहेत. त्या हरकतींनुसार जिल्हाधिकारी अभिप्रायासह विभागीय आयुक्तांना प्रस्ताव सादर करण्यात येणार असून, त्यावर पुन्हा हरकती घेऊन सुनावणी घेतली जाईल.




**नगर परिषदांचा आराखडा 25 जुलैपर्यंत**

- ‘येत्या २५ ते २९ जुलैपर्यंत नगर परिषदांकडून. तसेच नगर पंचायतीकडून ३० जुलै ते सहा ऑगस्टपर्यंत प्रारूप आराखडा सादर करण्याचे आदेश दिले आहेत,’ असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# पिंपरी-चिंचवडमधील लघु उद्योग वाचवा

## उद्योगनगरीत पायाभूत सुविधांसाठी करावा लागतोय संघर्ष; खंडित वीजपुरवठ्यामुळे उद्योग अडचणीत, लघु उद्योग संघटनेचे राज्य सरकारला साकडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगाच्या नकाशावर पिंपरी-चिंचवड शहराची ओळख उद्योगनगरी म्हणून आहे. मोठ्या उद्योगांसह या ओळखीमध्ये लघु उद्योगांचाही मोठा वाटा आहे; मात्र सर्वाधिक कर मिळवून देत शहराच्या विकासात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या लघु उद्योजकांवर कित्येक वर्षांपासून पायाभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे, ही शोकांतिका आहे. खंडित वीजपुरवठ्याचा प्रश्न जैसे थे आहे. लघु उद्योजकांसमोरील समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. शहरातील उद्योग वाचवण्यासाठी आता उद्योजकांनी उद्योग आणि ऊर्जामंत्र्यांकडे साकडे घातले आहे.

एकीकडे उद्योग आणि ऊर्जा मंत्रालयाकडून पिंपरी-चिंचवडमधील लघुउद्योग वाढले पाहिजेत यासाठी तडजोड केली जाणार नसल्याचे सातत्याने जाहीर करण्यात येत आहे. मात्र, दुसरीकडे खंडित वीजपुरवठ्याचा प्रश्नही सोडवला जात नाही. याबाबतच्या तक्रारी वाढत चालल्या आहेत. संबंधित विभागाला कल्पना दिली तरी फक्त आश्वासने दिली जात आहेत. त्यामुळे लघु उद्योजकांनी सरकारकडे आम्हाला वाचवा, अशी आर्त हाक देण्यास सुरुवात केली आहे.

पिंपरी-चिंचवड या उद्योगनगरीला विजेच्या समस्यांचे ग्रहण लागले आहे. विजेच्या सततच्या लपंडावाने उत्पादन ठप्प होत आहे. ऑर्डर रद्द करण्याची नामुष्की, कामगारांच्या अतिरिक्त पगाराचा बोजा यामुळे लघु उद्योजकांचे कोट्यवधींचे नुकसान होत आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे वीजसमस्या सोडवताना महावितरणची दमछाक होत आहे. लघुउद्योग टिकवण्यासाठी महावितरणची जुनी व जीर्ण यंत्रणा बदलण्याची मागणी संघटनांकडून केली जात आहे.

शहरात पिंपरी-चिंचवड, भोसरी, मोशी, चिखली आणि तळवडे एमआयडीसीत सुमारे १३ हजार लघुउद्योग आहेत. येथे टाटा मोटर्स, बजाज ऑटो, सँडविक एशिया, अॅटलास कॉप्को, थरमॅक्स, सेंच्युरी एन्कासह अन्य बहुराष्ट्रीय कंपन्यांना लागणाऱ्या सुट्या भागांचे उत्पादन घेतले जाते. मात्र, गेल्या १५ वर्षांपासून येथील लघुउद्योजक वीज समस्यांनी हैराण झाले आहेत.




### तक्रार करूनही समस्येकडे दुर्लक्ष

» कधी दोन दोन दिवस बत्ती गुल असते. या समस्यांबाबत लघुउद्योजकांच्या विविध संघटनांनी महावितरणचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, संचालक ते थेट ऊर्जामंत्र्यांकडे पाठपुरावा करून विजेच्या समस्या कायम आहेत. दर गुरुवारी देखभाल-दुरुस्तीसाठी कामाचे स्वरूप पाहून वीजपुरवठा खंडित ठेवण्याचे वेळापत्रक तयार केले आहे, असे महावितरण प्रशासन म्हणणे आहे. तर उद्योजकांच्या म्हणण्यानुसार हे वेळापत्रक सकाळी दहा ते सायंकाळी साडेपाच असे असते. इतर दिवशीही दिवसातून अनेकदा वीज खंडित होते. वीज खंडित झाल्यास उत्पादन प्रक्रिया ठप्प होते. कामगारांना बसून पगार द्यावा लागतो. वेळेत मालाचा पुरवठा करण्यासाठी वेळप्रसंगी कामगारांना ओव्हरटाइमचा पगार द्यावा लागतो. मालाचा वेळेत पुरवठा न झाल्यास ऑर्डर मिळणे कठीण होते. कंपन्यांची विश्वासार्हता गमावण्याची वेळ येते. ऑर्डर रद्दची नामुष्की ओढवते.

### दर्जेदार सेवा आवश्यक

» महावितरणचे कंडक्टर, फीडर, ट्रान्सफॉर्मर, विद्युत तारा बदलाव्यात. दोन फीडरमधील अंतर कमी करावे. महावितरणकडून दर्जेदार सेवा देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न व्हावेत. विद्युत खांबालगतच्या व विद्युत तारांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची नियमित छाटणी करावी.

> वीजपुरवठा खंडित होण्याचा सर्वाधिक फटका लघुउद्योजकांना बसतो. ही समस्या सोडवण्यासाठी महावितरणच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ऊर्जा मंत्र्यांपर्यंत पाठपुरावा केला, तरीही समस्या सुटत नसेल तर न्याय मागायचा तरी कुणाकडे, हा प्रश्न पडला आहे.
>
> - संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना

> वादळी पावसामुळे काही ठिकाणी अडचणी निर्माण झाल्या होत्या. एमआयडीसीसाठी दर आठवड्याला विजेच्या समस्यांचा आढावा घेऊन त्या तत्काळ दूर करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या जातात.
>
> - विकास पुरी, प्रभारी जनसंपर्क अधिकारी, महावितरण

# हिंजवडी 'वॉटर पार्क'ला विरोधकच जबाबदार : मंत्री मुरलीधर मोहोळ

## केंद्रीय मंत्री मोहळ यांनी कोणत्या नेत्याचे नाव न घेता हिंजवडीच्या सध्याच्या परिस्थितीला त्यांनी विरोधकांना जबाबदार धरले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारे हिंजवडी आयटी पार्क सध्या अनेक समस्यांच्या विळख्यात अडकले आहे. पायाभूत सुविधांची दुरवस्था, रस्त्यांची खराब अवस्था, वाहतूक कोंडी, अपुऱ्या सार्वजनिक वाहतूक सुविधा, पाणी व ड्रेनेज समस्यांमुळे येथील आयटी व्यावसायिक आणि रहिवासी त्रस्त झाले आहेत. अशातच, पावसामुळे आयटी पार्कचे वॉटर पार्कमध्ये निर्माण झाल्यामुळे येथील नागरिकांना नव्या समस्येला सामोर जाव लागत आहे. अशातच, शरद पवारांचं ड्रीम प्रोजेक्ट असणाऱ्या हिंजवडी आयटी पार्कचं वॉटर पार्क नेमकं कोणामुळं झालं? किंबहुना, पवार कुटुंबाचं राजकारण त्यासाठी कारणीभूत आहे का? असा प्रश्न उपस्थित होत असतानाच केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विरोधकांवर खापर फोडले आहे.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना मोहळ यांनी कोणत्या नेत्याचे नाव न घेता हिंजवडीच्या सध्याच्या परिस्थितीला त्यांनी विरोधकांना जबाबदार धरले आहे. "केंद्रीय मंत्री होण्यापूर्वी माझे कार्यक्षेत्र मर्यादीत होते. आत्ता एक वर्षे झाले आहेत, की मी पुण्याचा खासदार झालो आणि केंद्रात मला पक्षाने काम करण्याची संधी दिली. पण मी माझी जबाबदारी झटकणार नाही.

पण गेली पंधरा वीस वर्षांपूर्वी ज्यांचे सरकार होते. आज हीच माणस ट्विट करत आहे. तेच लोक टीका करत आहेत. त्यांनी तेव्हाच ही समस्या सोडवायला हवी होती. पण ठिक आहे. आता काही झाल तरी आमची जबाबदारी आहे." अशा शब्दात विरोधकांची नावे न घेता हिंजवडीकरांना मोहोळ यांनी दिलासा दिला आहे. तसेच, हिंजवडीमधून नागरिक बाहेर पडत आहेत यामध्ये कोणतेही तथ्य नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.




### न्यायालयाने दिले हे आदेश

» हिंजवडी आणि शेजारील गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण वाढल आहे. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहे. पीएमआरडी तसेच पिंपरी चिंचवड हद्द असेल नागिरीकीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे सगळ्या नागरी सुविधा देण क्रमप्राप्त आहे. मात्र काही अडचणी जाणवत आहेत. पण मी आता या समस्येमध्ये व्यक्तीगत लक्ष घातले आहे. अशी माहिती देखील मोहोळ यांनी यावेळी दिली.

# पूररेषेचा निर्णय चार महिन्यांत घ्या; उच्च न्यायालयाचे राज्य शासनाला आदेश

## पूररेषा व पूररेषेपासून शंभर मीटरपर्यंत बांधकामास मनाई करावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका न्यायालयाने निकाली काढली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा-मुठेच्या पूररेषेसाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने त्यांच्या अहवालातील शिफारशी राज्य शासनाला दोन महिन्यांत सादर कराव्यात, या शिफारशींवर राज्य शासनाने दोन महिन्यांत योग्य तो निर्णय घ्यावा, असे महत्त्वपूर्ण आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासमवेतच पूररेषा व पूररेषेपासून शंभर मीटरपर्यंत बांधकामास मनाई करावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका न्यायालयाने निकाली काढली आहे.

महापालिकेच्या 2017 मधील विकास आराखड्यात (डीपी) नद्यांच्या पूररेषा चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आल्याचा आरोप पर्यावरणवादी सारंग यादवडकर, माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार आणि विवेक वेलणकर यांनी केला.

त्यासंदर्भात 2021 मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यामध्ये या नद्यांच्या पूररेषा अशास्त्रीय पद्धतीने आखल्या गेल्या असून त्या शास्त्रीय पद्धतीने पुन्हा आखण्यात याव्यात, अशी मागणी केली होती.



### न्यायालयाने दिले हे आदेश

» उच्चस्तरीय समितीने त्यांचा अहवाल दोन महिन्यांच्या मुदतीत शासनाला सादर करावा. हा अहवाल मिळाल्यानंतर शासनाने पुढील दोन महिन्यात त्यातील शिफारसींवर योग्य ती कृती करावी, असे आदेश दिले. तसेच, याचिकाकर्ते राज्य शासनाला या संदर्भात सूचना देऊ शकतात, असे महत्त्वाचे आदेश न्यायालयाने ही याचिका निकालात काढताना दिले आहेत.

याबाबत माहिती देताना याचिकाकर्ते म्हणाले, या सुनावणीत जलसंपदा खात्यानेही उच्च न्यायालयात पुण्यातील पूररेषा शास्त्रीय पद्धतीने आखण्यात आलेल्या नाहीत, असे प्रतिज्ञापत्र सादर केले.

या प्रतिज्ञापत्राच्या आधारावर उच्च न्यायालयाने एक उच्चस्तरीय समिती स्थापन करून पुण्यातील पूररेषांचे पुनरावलोकन करण्याचे निर्देश दि. 26 जून 2024 रोजी दिले. या निर्देशांन्वये उच्चस्तरीय समितीतील एक सदस्य, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांनी पुण्यातील नद्यांमध्ये निळ्या आणि लाल पूररेषांची आखणी करण्यासाठी किती पूर गृहीत धरण्यात यावा, याची आकडेवारी जानेवारी 2025 मध्ये सादर केली.

त्यानंतर या उच्चस्तरीय समितीची एकही बैठक आजतागायत झालेली नाही आणि त्यामुळे पुण्यातील पूररेषांच्या पुनरावलोकनाच्या कामात पुढे काहीही प्रगती झालेली नाही. या सर्व पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने ही याचिका निकालात काढली.

मुळा-मुठेच्या पूररेषेसाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने त्यांच्या अहवालातील शिफारशी राज्य शासनाला दोन महिन्यांत सादर कराव्यात, या शिफारशींवर राज्य शासनाने दोन महिन्यांत योग्य तो निर्णय घ्यावा, असे महत्त्वपूर्ण आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासमवेतच पूररेषा व पूररेषेपासून शंभर मीटरपर्यंत बांधकामास मनाई करावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका न्यायालयाने निकाली काढली आहे.

> “ पूररेषेसंदर्भातील याचिका उच्च न्यायालयाने निकाली काढली आहे. त्यात शासनास सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुढील प्रक्रिया केली जाईल. याचिकेत बांधकामांना बंदी घालण्याचीही मागणी होती. मात्र, त्याबाबत न्यायालयाने महापालिकेला कोणतेही आदेश दिलेले नाहीत.
>
> \- ॲड. निशा चव्हाण, मुख्य विधी अधिकारी

> “ न्यायालयाने आता उच्चस्तरीय समिती आणि शासनाला कालमर्यादा घालून दिली आहे. त्यामुळे या समितीपुढे ममेरीफ या संस्थेने सादर केलेला अहवाल धक्कादायक आहे. त्यामुळे त्यानुसारच समिती आणि शासनाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.
>
> \- सारंग यादवडकर, याचिकाकर्ते

# चिंबळी ते माजगाव रस्ता खचला, घरदांळे, शिंदेवस्ती दरम्यान चार फूट खड्डा

## पाण्याच्या योग्य निचरा होत नसल्याने भराव वाहून जात आहे, यामुळे येथे सिमेंट रस्ता करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

चिंबळी ते माजगाव रस्ता घरदांळे, शिंदेवस्ती दरम्यान चार फूट खचला असून वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करण्याची वेळ आली आहे. जिल्हा परिषदेच्या निधीतून काही वर्षांपूर्वी हा रस्ता करण्यात आला होता. येथील जलजीवनच्या कामाच्या दरम्यान या भागात खोदकाम झाले होते. त्यानंतर पहिल्याच पावसात येथील रस्ता खचला आहे. शिवाय या ठिकाणी पाण्याच्या देखील योग्य निचरा होत नसल्याने भराव वाहून जात आहे. यामुळे येथे सिमेंट रस्ता करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

या रस्त्यावर सुरुवातीच्या आणि शेवटच्या टप्प्यात सिमेंट कॉंक्रिट झाले आहे.मात्र मध्य भागातील काम बाकी आहे.याबाबत स्थानिकांनी मागणी केल्यानंतर निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. या भागातील रस्त्यासाठी शासनाने निधी देऊन येथील दळणवळणाचा गंभीर बनलेला प्रश तातडीने सोडविण्याची गरज आहे. बारा फूट रस्त्यापैकी चार फूट रस्ता खचला आहे. यामुळे वाहनचालकांना रात्रीच्या वेळी अंधारात वाहने काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्ता खचल्याने मोठ्या प्रमाणात पाणी स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतात घुसले आहे. यामुळे त्यांच्या पिकांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. नागरिकांना जीवनमान जगताना अडचणी होत असताना देखील प्रशासन सुस्त का असाही सवाल आता उपस्थित होत आहे.



जिल्हा परिषदेच्या निधीतून काही वर्षांपूर्वी हा रस्ता करण्यात आला होता. येथील जलजीवनच्या कामाच्या दरम्यान या भागात खोदकाम झाले होते. त्यानंतर पहिल्याच पावसात येथील रस्ता खचला आहे. शिवाय या ठिकाणी पाण्याच्या देखील योग्य निचरा होत नसल्याने भराव वाहून जात आहे. यामुळे येथे सिमेंट रस्ता करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

### धोकादायक रस्ता मात्र प्रशासन सुस्तच

» दोन महिन्यांपासून हा रस्ता खचला आहे; मात्र अद्याप येथे दुरुस्ती करण्यात आलेली नाही. मावळ धरण पुनर्वसनमधून स्थापित करण्यात आलेल्या माजगाव या गावाला जाणारा हा एकमेव मुख्य रस्ता आहे; मात्र तरीही त्याची दुरुस्तीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

> “ शासनाकडे लोकांच्या सामान्य गरजांसाठी देखील पैसे नाहीत का? हा रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी दिला जात नाही. जिल्हा परिषद, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग एवढे निधी देऊ शकतील; मात्र तरीही आमच्या अडचणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.
>
> \- शांताराम घरदाळे, स्थानिक रहिवाशी